# ग्रंथालयातून करिअरला चालना

27-2-17

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



शिक्षणाचा समृद्ध वारसा लाभलेल्या ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये सुमारे ५५ हजारांची ग्रंथसंपदा आहे. या विपुल ग्रंथसंपदेतून विद्यार्थ्यांना निबंध व वक्तृत्व स्पर्धेची तयारी करून घेतली जाते. त्याचबरोबर ग्रंथ परीक्षण स्पर्धा घेऊन विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना दिली जाते. त्यामुळेच प्रत्येक महाविद्यालयीन निबंध व वक्तृत्व स्पर्धेत कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींचे यश उल्लेखनीय असेच राहिले आहे.

सध्याच्या विद्यार्थ्यांचे वाचनाकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका होत असताना कमला कॉलेजच्या विद्यार्थिनी त्याला अपवाद ठरल्या आहेत. सुमारे ५५ हजार ग्रंथसंपदा असलेल्या ग्रंथालयात कथा, कादंबऱ्या, चरित्र ग्रंथ, आत्मकथा, स्फूट लेखन आणि संदर्भग्रंथांचा भरणा आहे. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी लागणाऱ्या तब्बल दीड हजार लेटेस्ट पुस्तकांचा संच आहे. शैक्षणिक अभ्यासक्रमासोबत विद्यार्थिनी या विपुल ग्रंथसंपदेतून आपली वैचारिक बैठक बनवत आहेत. अकरावी-बारावीच्या विद्यार्थिनींना ग्रंथालयामध्ये थेट प्रवेश दिला जात नसला, तरी पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींना थेट प्रवेश देऊन हवी ती पुस्तके देण्याची मुभा कॉलेजने दिली आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थिनींना ग्रंथालयामध्ये स्वत: पुस्तके हाताळण्याचा अनुभव मिळतो.

'कमला'मध्ये ५५ हजार ग्रंथसंपदेचा खजिना

निबंध व वक्तृत्व स्पर्धेसाठी खास तयारी करण्यासाठी संदर्भग्रंथ पुरवले जातात. करिअरदृष्ट्या मुलीही सजग बनल्यामुळे खास स्पर्धा परीक्षा तयारीसाठी संदर्भ पुस्तके ठेवली आहेत. त्यासाठी त्यांना स्वतंत्र ओळखपत्र देऊन ही सुविधा मोफत दिली जात आहे. पदवी प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थिनींचे वाचनाकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी माफक शुल्कात ग्रंथालय उपलब्ध करून दिले जाते, त्याचा उपयोग दरवर्षी माजी विद्यार्थिनींना होतो. त्यामुळे दरवर्षी सुमारे ५० ते ६० विद्यार्थिनी या सुविधांचा वापर करतात. याचबरोबर समाजातील इतर वाचकप्रिय व्यक्तींना माफक दरात वर्षभरासाठी मेंबरशिप देऊन वाचनसंस्कृती टिकवण्यासाठी प्रयत्न केला जातो. यासाठी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षक ग्रंथसंपदा वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

**दृष्टिक्षेपात कमला कॉलेज**

एकूण विद्यार्थिनी
**२४८०**

ग्रंथसंपदा
**५५ हजार**

स्पर्धा परीक्षा लेटेस्ट संग्रह
**१५००**

माजी विद्यार्थिनी सदस्य
**५०**

ग्रंथालयाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना पुस्तके देऊन निबंध व वक्तृत्व स्पर्धेची तयारी करून घेतली जाते. त्यामुळे विविध महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींचे हमखास यश असते. तसेच कॉलेजच्या माजी विद्यार्थिनींना वर्षभरासाठी मोफत पुस्तके वाचण्यासाठी दिली जातात, त्याचा उपयोग वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी होतो.

-ऊर्मिला कदम,
ग्रंथपाल, कमला कॉलेज